राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र पुरस्कृत योजना राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत कार्यक्रमांसाठी सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१६-१७ मधील राज्य हिश्श्यापोटी रू.९३३.०८ लक्ष अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः राआअ-२०१७/प्र.क्र.२२३/आरोग्य-७
१० वा मजला , गोकुळदार तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक: ३१ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र.०५/कार्यासन-६, दिनांक ३१/०३/२०१८
२) आयुक्त (आरोग्य सेवा)तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांचे पत्र क्र.राआसोम/एफएमजी/राहि/१०९१२२-१२९/२०१७-१८,दिनांक ०७/०२/२०१८

प्रस्तावना :-

ग्रामीण भागातील गरीब, दुर्लक्षित तसेच गरजू ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह, आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले. आरोग्यावर परिणाम करणाऱ्या महत्वाच्या घटकांचा (उदा. आहार, परिसर, स्वच्छता, सुरक्षित पाणी पुरवठा, महिला व बालविकास इ.) या अभियानामध्ये एकत्रितपणे विचार करण्यात आलेला आहे. सन २०१३-१४ या वर्षापासून केंद्र शासनाने उपरोक्त आरोग्य विषयक कार्यक्रम शहरी भागात सुध्दा राबविण्याचा निर्णय घेतला असून शहरी भागात हा कार्यक्रम "राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान" या नावाने राबविण्यात येत आहे. सदर अभियानाकरिता केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा यांचे प्रमाण ६०:४०

इतके असून केंद्र शासनाने ६०% हिश्श्यापोटी आदिवासी जनजाती क्षेत्र उप योजने अंतर्गत सन २०१६-१७ साठी पहिला हफ्ता वितरीत केला असून सदर अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राज्यामध्ये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत सन २०१३-१४,२०१४-१५ व सन २०१६-१७ या वर्षातील आदिवासी उपयोजना घटकांतर्गत प्रलंबित राज्य हिश्श्याचा रु.९३३.०८ लक्ष (रुपये नऊ कोटी तेहतीस लक्ष आठ हजार फक्त) एवढा निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सहसंचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१६/प्रक्र.८९/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिच्छेद ७ ते१८ व सोबतच्या परिशिष्टामधील अनु.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

४. सदर प्रस्तावावरील राज्य हिश्श्याचा खर्च T-५, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१- नागरी आरोग्य सेवा-विषम चिकित्सा, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना- राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०४) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (राज्य हिस्सा) (२२१०F८६३) - ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. सदरचे देयक सशर्त असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/ प्र.क्र.८५/ २०१३/ अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १५०/२०१८/व्यय १३, दिनांक २३/०३/२०१८ अन्वये प्राप्त सहमतीने आणि वित्त विभागाच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ च्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३३११२३५३४४०१७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: CN = Amol Nilakanth Sakharkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department
Date: 2018.03.31 20:21:31 +05'30'

(अ. नि. साखरकर)
अवर सचिव

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.

२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
६. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
७. सहाय्यक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
८. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई .
११.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१३.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१४.निवडनस्ती (आरोग्य -७) .